महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : सीएमए-०४२३/सीआर-०१/२०२३/जाहिरात जाहिरात क्रमांक: ०११/२०२३

# महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा - २०२३

**महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांतर्गत खालील संवर्गातील एकूण ६७३ पदांच्या भरतीकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा-२०२३, रविवार, दिनांक ०४ जून , २०२३ रोजी महाराष्ट्रातील एकूण ३७ जिल्हा केंद्रांवर घेण्यात येईल :-**

| अ. क्र. | विभाग | संवर्ग | वेतनश्रेणी | एकूण पदे |
|---|---|---|---|---|
| १ | सामान्य प्रशासन विभाग | राज्य सेवा गट-अ व गट-ब | गट-अ व गट-ब संवर्गाच्या वेतन स्तरानुसार | २९५ |
| २ | पाणी पुरवठा व स्वच्छता, जलसंपदा, मृद व जलसंधारण विभाग | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा गट-अ व गट-ब | | १३० |
| ३ | सार्वजनिक बांधकाम विभाग | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा गट-ब | | १५ |
| ४ | अन्न व नागरी विभाग | निरीक्षक, वैधमापन शास्त्र, गट-ब | | ३९ |
| ५ | वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग | अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-ब | | १९४ |

**२.** प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या विविध संवर्गातील सर्व पदांचा सविस्तर तपशील सोबतच्या **परिशिष्ट-एक** मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे.

**३.** संयुक्त पूर्व परीक्षेच्या निकालाधारे संबंधित संवर्गाच्या मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांकरीता स्वतंत्र मुख्य परीक्षा खालीलप्रमाणे आयोजित करण्यात येतील:-

| अ.क्र. | परीक्षा | वार व दिनांक |
|---|---|---|
| १ | राज्य सेवा मुख्य परीक्षा - २०२३ | ७, ८ व ९ ऑक्टोबर, २०२३ |
| २ | महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा गट-अ व गट-ब मुख्य परीक्षा - २०२३ | १४ आक्टोबर, २०२३ |
| ३ | महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा गट-ब मुख्य परीक्षा - २०२३ | १४ आक्टोबर, २०२३ |
| ४ | निरीक्षक, वैधमापन शास्त्र, गट-ब मुख्य परीक्षा - २०२३ | २१ आक्टोबर, २०२३ |
| ५ | अन्न व औषध प्रशासकीय सेवा, गट-ब मुख्य परीक्षा - २०२३ | २८ आक्टोबर, २०२३ |

**४.** जाहिरातीमध्ये विहित केलेल्या अटी व शर्तीची पुर्तता करणा-या उमेदवारांकडून विहित पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**५.** पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-

**५.१** पदसंख्या व आरक्षणामध्ये शासनाच्या संबंधित विभागांच्या सूचनेनुसार बदल/वाढ होण्याची शक्यता आहे.

**५.२** पदसंख्या व आरक्षणामध्ये बदल झाल्यास त्याचा समावेश मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेमध्ये करण्यात येईल. तसेच याबाबतची घोषणा/सूचना वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या घोषणा/सूचनांच्या आधारे प्रस्तुत परीक्षेमधून भरावयाच्या पदाकरीता भरती प्रक्रिया राबविण्यात येईल.

**५.३** पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंतच्या कालावधीपर्यंत शासनाकडून सुधारित/अतिरिक्त मागणीपत्राद्वारे प्राप्त होणारी सर्व पदे पूर्व परीक्षेच्या निकालासाठी विचारात घेण्यात येतील.

**५.४** प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे (महिला, खेळाडू, माजी सैनिक, दिव्यांग व्यक्ती, अनाथ) उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करेपर्यंत नव्याने प्राप्त होणा-या मागणीपत्रांमध्ये जाहिरातीत नमूद नसलेल्या मागास प्रवर्ग तसेच समांतर आरक्षणाकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या/अतिरिक्त मागणीद्वारे प्राप्त संवर्गातील पदे पूर्व परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव पूर्व परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पद आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे पूर्व परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

**५.५** महिला, खेळाडू , दिव्यांग तसेच अनाथांसाठीचे समांतर आरक्षण शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार राहील.

**५.६** महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणा-या उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रीमीलेअर मध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.